# मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालय यांचे

माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये,

नियम ४(क),(ख) नुसार माहिती

# मुख्य विद्युत निरीक्षक

## कार्यालयाचे कार्य

**प्रास्ताविक**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग हयांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली मुख्य विद्युत निरीक्षक हे विद्युतविषयक कार्य करतात.

मुख्य विद्युत निरीक्षक हे या वैधानिक पदाचे कार्य करीत असून यांचे नियंत्रणाखाली प्रामुख्याने विद्युत सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विद्युतसंच मांडणीची तपासणी करणे, उच्च व अतिउच्चदाब विद्युत संचमांडणी उपयोगात आणण्याकरिता परवानाधारक व उपभोक्त्यास (विद्युत ग्राहक) परवानगी देणे, विद्युत प्राणांतिक व अप्राणांतिक अपघाताची चौकशी करणे, अनुज्ञापक मंडळामार्फत विद्युत पर्यवेक्षक,तारतंत्री व सनदी विद्युत सुरक्षा अभियंता परीक्षा घेणे व उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देणे, सिनेमा यंत्रचालकाची चाचणी घेऊन त्यांना परवाना पत्र देणे, घरगुती विद्युत उपकरणे बनविणा-या लहान मोठया कंपन्यांच्या उत्पादित वस्तुंची सुरक्षिततेच्या दृष्टीने गुणवत्ता व दर्जा तपासून प्रमाणपत्र देणे, विद्युत शुल्क, वीज विक्रीवरील कर यांचे वसुलीचे नियंत्रण ही कामे केली जातात.

Review Meeting Ease of doing Business-२०१७ व २०१८ अन्वये शासनाच्या व्यवसाय सुलभ संकल्पनेच्या (ease of doing business) अनुषंगाने महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग अधिसूचना क्र.२०१५/प्र.क्र.६५० दि.२९ जानेवारी, २०१६ आणि अधिसूचना क्र.मुविनि/प्र.क्र.२५४/उर्जा-५ दि. १२ डिसेंबर, २०१८ अन्वये च्या अधिसुचनेनुसार या विभागाच्या खालील सेवा महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम-२०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यांत आल्या आहेत.

१) जनित्र संच मांडणीचे नकाशे मंजूर करणे .

२) जनित्र संच मांडणी निरीक्षण करणे व उर्जापित करण्यास परवानगी देणे .

३) मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९६२ अन्वये ज्या व्यक्ती वीज निर्मिती करु इच्छितात किंवा वीज निर्मिती करणे चालु इच्छितात त्यांची नोंदणी करणे.

४) उपरीतार मार्गाच्या वीज संच मांडणीचे नकाशे मंजूर करणे.

५) उपरीतार मार्गाच्या वीज संच मांडणीचे निरीक्षण करणे व उर्जापित करण्यास परवानगी देणे.

६) महाराष्ट्र उदवाहन अधिनियम, १९३९ अन्वये उदवाहन उभारणीस परवानगी देणे .

७) महाराष्ट्र उदवाहन अधिनियम, १९३९ अन्वये उदवाहन चालु व निरीक्षणे अनुमती देणे उक्त सेवा महाराष्ट्र शासनाच्या "आपले सरकार" aaplesarkar.mahaonline.gov.in या पोर्टलवर दि. २ ऑक्टोंबर २०१६ पासून ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहेत .

वरील सर्व कामे पार पाडण्यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या आस्थापनेवर एकूण ४ अधीक्षक अभियंता, ४० विद्युत निरीक्षक, ७८ सहाय्यक विद्युत निरीक्षक, ३९७ सहाय्यक अभियंते/ शा.अ/ क.अ तसेच लेखा परीक्षणासाठी, १ उप संचालक, ९ वीज कर निरीक्षक व इतर आवश्यक कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत.

मुख्य विद्युत निरीक्षक यांचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यासंबंधीचे प्रमुख कार्य खालीलप्रमाणे :-

**(अ) विद्युतविषयक खालील अधिनियम व नियम यांची अंमलबजावणी :-**

(१) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १२६ अनुसार परवानाधारकाने उच्चदाब व अतिउच्चदाब ग्राहकांनी केलेल्या अनधिकृत वीज वापर निर्धारणा विरुध्द अपीलप्रकरणी कलम १२७ अन्वये निर्णय देणे.

(२) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ५३ नुसार विद्युत सुरक्षाविषयक कर्तव्य पार पाडणे.

(३) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ नुसार कर्तव्य पार पाडणे.

(४) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १६१ अन्वये व विद्युत अपघात नियम, २०१३ अन्वये विद्युत अपघातांची चौकशी करणे.

(५) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १६२ अन्वये प्राप्त अधिकार व निर्देशित कर्तव्यानुसार कार्य करणे.

(६) मुंबई उद्वाहन अधिनियम, १९३९ व त्याखाली तयार केलेले मुंबई उद्वाहन नियम, १९५८ ची अंमलबजावणी करणे.

(७) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ आणि मुंबई विद्युत शुल्क नियम, १९६२ यांची अंमलबजावणी

(८) महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील शुल्क अधिनियम, १९६३ व महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील शुल्क नियम १९६४ त्याखालील नियम व सुधारीत विद्युत विक्रीकर अधिनियम, २००४

(९) महाराष्ट्र सिनेमा (विनियम)अधिनियम, १९६६

(१०) केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठासंबंधी उपाययोजना विनियम) २०१० मधील विनियम २९ अन्वये बनविण्यांत आलेल्या नियमानुसार अंमलबजावणी करणे.

(११) महाराष्ट्र रज्जूमार्ग अधिनियम, १९५५ व त्याखाली तयार केलेले महाराष्ट्र रज्जूमार्ग नियम.

(१२) केंद्र शासनाचा घरगुती विद्युत उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१ ची अंमलबजावणी.

१३) केंद्र शासनाच्या विद्युत वायर्स, केबल्स, उपकरणे व उप साधने (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१, १९८८, १९८९, १९९३ व दर्जा नियंत्रण आदेश, २००३ ची अंमलबजावणी. व विद्युत वायर्स केबल्स, उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश २००५.

**(ब) मुख्य विद्युत निरीक्षक यांची इतर कार्ये :-**

(१) विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ति मंजूर करणे विद्युत पर्यवेक्षक, तारतंत्री सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांच्या परीक्षा घेऊन उत्तीर्ण उमेदावारांना प्रमाणपत्र देणे यांसाठी प्रस्थापित केलेल्या अनुज्ञापक मंडळाचे मुख्य विद्युत निरीक्षक हे अध्यक्ष आहेत.

(२) दर्जा नियंत्रण आदेश,१९८१, १९८८, १९९३ व २००३ अंतर्गत प्रमाणपत्र देणे यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक हे महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले " समुचित प्राधिकारी " आहेत.

(३) २२० केव्ही व त्यापेक्षा जास्त विद्युत दाब असलेल्या वीज संचमांडणीचे नकाशांना मंजुर देणे, प्रथम निरीक्षण करणे व परवानगी देणे व वार्षिक निरीक्षण करणे.

(४) २२० केव्ही व त्यापेक्षा जास्त एच.व्ही.डी.सी. विद्युत दाब असलेल्या वीज संचमांडणीचे नकाशांना मंजुरी देणे, प्रथम निरीक्षण करणे व परवानगी देणे.

(५) नवीन वीजनिमिर्ती केंद्राचे ५०० मे. वॅ. क्षमतेपेक्षा जास्त क्षमता असलेल्या पारंपारिक व अपारंपारिक सर्व वीज संचमांडणीच्या नकाशांना परवानगी देणे, प्रथम निरीक्षण करणे व ऊर्जार्पित करण्यासाठी परवानगी देणे.

**समग्र कार्यक्रम**

विद्युत विभागाचे मुख्य कार्य म्हणजे वेगवेगळे विद्युतविषयक अधिनियम, नियम आणि विनियम यांची सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अंमलबजावणी करणे. विद्युत कराचे वसुलीवर नियंत्रण, इत्यादी महसूल कामकाज.

**१.विद्युत संच मांडण्याची तपासणी-** केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठासंबंधी उपाययोजना) विनियम, २०२३ च्या तरतुदीनुसार विविध विद्युत संच मांडण्याची सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तपासणी केली जाते.

शासन पत्र क्र. ईएलडी-२०१२/प्र.क्र.८५/ऊर्जा-१, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ३ जानेवारी २०१२ अन्वये विद्युत संच मांडणीचे निरीक्षण व तपासणी संबधात आकारण्यात व वसूल करण्यांत येणारी फी स्थगित करण्यांत आलेली आहे.

**विद्युत प्राणांतिक व अप्राणांतिक अपघात**

विद्युत अधिनियम २००३ चे कलम १६१ अन्वये तसेच विद्युत अपघाताची सूचना नियम, २००५ अन्वये प्राप्त प्राधिकारानुसार विद्युत अपघाताची चौकशी करणे.

**सिनेमा यंत्र चालकांची चाचणी** - महाराष्ट्र सिनेमा (विनियम) अधिनियम, १९६६ मधील नियम ७२ नुसार वीज संयंत्र व चित्रदर्शक उपकरणे ही अर्हताप्राप्त व्यक्तीच्या हाती असावीत व अशी व्यक्ती सिनेमा परवानाधारकाने नामनिर्देशित केलेली असावी या दृष्टीकोनातून सिनेमा यंत्रचालकाची चाचणी घेतली जाते व अशा व्यक्तीच्या नामनिर्देशनास विद्युत निरीक्षकाकडून प्रमाणपत्र दिले जाते.

**२.अनुज्ञापक मंडळ-** सध्या मुख्य विद्युत निरीक्षक हे अनुज्ञापक मंडळाचे अध्यक्ष असून विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक) हे मंडळाचे सचिव आहेत. याशिवाय या विभागांतर्गत कार्यरत असलेले चारही प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळाचे अधीक्षक अभियंता (मुंबई/ पुणे/ **छत्रपती संभाजी नगर** व नागपूर) हे अनुज्ञापक मंडळाचे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे विविध संस्था, उपक्रम तसेच संघटनांचे प्रतिनिधी यांचे एकूण ९ सदस्य आहेत. अनुज्ञापक मंडळामध्ये १ अध्यक्ष, १ सचिव व एकूण १३ सदस्य यांचा समावेश आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण अधिनियम, २०२३ मधील विनियम ३१ अन्वये अधिसुचना क्रमांक-संकीर्ण २०१६/प्र.क्र./१२३/ऊर्जा-५ दिनांक ०२ जानेवारी, २०१७ नुसार अधिसुचित केलेल्या नियम व शर्तींच्या "प्रकरण दोन" मधील नियम ११ नुसार पर्यवेक्षक व तारतंत्री परीक्षा घेण्यात येतात. अर्हताप्राप्त उमेदवारास सूट देण्यात येते. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ६ मध्ये दर्शविला आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठासंबंधी उपाययोजना) विनियम, २०२३ च्या विनियम ६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांच्या परीक्षा घेणे व निकाल जाहीर करणे.

**३.विद्युत ठेकेदार विरुध्द केलेल्या तक्रारीची चौकशी-**

जर एखादा अनुज्ञप्तीधारक वीज ठेकेदार गैरव्यवहार करीत असल्याचे आढळल्यास केंद्रीय विद्युत प्राधिकरण अधिनियम, २०२३ मधील विनियम ३१ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियम व शर्तीमधील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही केली जाते.

अनुज्ञापक मंडळामार्फत गंभीर गैरव्यवहाराच्या अनुषंगाने घेण्यांत येणारे तातडीचे निर्णय मुख्य विद्युत निरीक्षक अनुज्ञापक मंडळाचे अध्यक्ष म्हणून घेण्यास सक्षम असतील.

**४.उच्चदाब वीज ग्राहकांनी वीज पुरवठा कंपनी यांचेविरुध्द केलेले अपिल अर्ज.**- विद्युत अधिनयम, २००३ अंतर्गत कलम १२७ अन्वये मुख्य विद्युत निरीक्षक हे अपिलीय प्राधिकारी म्हणून कार्य करतात.

विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत कलम १२६ अन्वये वीजपुरवठा कंपनीने अनधिकृत वीज वापर प्रकरणी ग्राहकास दिलेल्या अंतिम निर्धारण देयकाबाबत अपील प्रकरणी सुनावणी घेऊन अतिम निकाल दिले जातात.

**५.उदवाहन**- मुंबई उदवाहन अधिनियम, १९३९ नुसार उदवाहन संच मांडणीचे उद्वाहनाचा सुरक्षित वापर होण्यासाठी निरीक्षण केले जाते. निरीक्षणाचे शुल्क उदवाहनाच्या मालकाकडून वसूल केले जाते. सुरक्षिततेच्या नियमांचे पालन केले नसल्यास सुरक्षा नियमांचे पालन होईपर्यंत उदवाहनाची अनुज्ञप्ती निलंबित करण्यांत येते.

मुंबई उदवाहन नियम, १९५८ च्या नियम क्रमांक ३ नुसार संबंधीत अधीक्षक अभियंता हे उदवाहनाच्या उभारणीसाठी किंवा संचमाडणीमध्ये फेरफार करण्यासाठी परवाना देतात. मुंबई उदवाहन नियम, १९५८ च्या नियम क्रमांक ४ नुसार ज्या मालकास उदवाहन उभारणीची परवानगी दिलेली असते त्यांना संबंधीत अधीक्षक अभियंता हे उद्वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती देतात. कनिष्ठ अभियंता स्विकृत परिमाण मासिक किमान १५० प्रमाणे वर्षाला २००० निरीक्षणे आहेत.

**६.विद्युत शुल्क** - महाराष्ट विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ दि.१ सप्टेंबर २०१६ पासून अस्तित्वात आला आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार वीज वापराच्या आकारावर विहीत टक्केवारीनुसार युनिटवर आधारीत विद्युत शुल्क आकारण्यांत येते. वीज वापराच्या आकारामध्ये एनर्जी चार्जेस, डिमांड चार्जेस आणि फयुअल ॲडजेस्टमेंट चार्जेसचा समावेश आहे. विद्युत शुल्काचे आकारणीसाठी वीज वापराचा उद्देश विचारात घेऊन विद्युत ग्राहकांची वर्गवारी केलेली आहे. हया वर्गवारीमध्ये प्रामुख्याने निवासी, वाणिज्यिक, कृषी, तात्पुरता, जाहिराती व फलक (होडींग्ज), औद्योगिक, मोनो व मेट्रो रेल्वे, स्वनिर्मित वीज, सह वीज निर्मितीपासून वीज, पर्यायी वीजनिर्मिती, नवीकरणीय ऊर्जेपासून वीज, स्वतंत्र वीज उत्पादक (आयपीपी), वीज जनित्रसंचधारक व मुक्त प्रवेश यांचा समावेश आहे. हया वर्गवारीनिहाय वीज शुकाचे दर वेगवेगळे आहेत.

**७.दर्जा नियत्रण :**- दर्जा नियंत्रण शाखेकडून घरगुती विजेची उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१, विद्युत उपकरणे( दर्जा नियंत्रण) आदेश, १९८८, व साधारण सेवा विद्युत दिवे (दर्जा नियत्रण) आदेश, १९८९, १९९३ व २००३ नुसार घरगुती विद्युत उपकरण बनविण-या लहान मोठया कंपन्यांच्या उत्पादित वस्तूंची सुरक्षिततेच्या द्दष्टीने गुणवत्ता व दर्जा तपासून उत्पादन प्रमाणपत्र देण्यांत येते. उत्पादकांना उत्पादित वस्तूंची चाचणी करुन दिलल्या प्रमाणपत्रासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता क्रमांक ७ आहे. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आरइई-२०४५/२००६-२००७/(९११)/प्रशासन-१, मंत्रालय, मुंबई दिनांक २३ फेब्रुवारी २००७ अन्वये दर्जा नियंत्रण शाखा सन २००७-२००८ पासून निरीक्षण शाखेमध्ये विलीन करण्यांत आली असून दिनांक १ एप्रिल २००७ पासून दर्जा नियंत्रणाचे संपूर्ण राज्यातील काम मुख्य विद्युत निरीक्षक यांचे अंतर्गत प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई / पुणे /औरंगाबाद / नागपुर यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे.

| तक्ता क्रमांक ७ | | | |
|---|---|---|---|
| **पदे व वेतनमान दर्शविणारे विवरणपत्र** | | | |
| पदनाम | वेतन | पदांची संख्या | |
| | बँड व ग्रेड वेतन | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ |
| १ | २ | ३ | ४ |
| **२०४५, विक्रेय वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क -** | रूपये | | |
| **मागणी क्रमांक के-१ निरीक्षणालय शाखा -** | | | |
| **राजपत्रित, वर्ग एक -** | | | |
| मुख्य विद्युत निरीक्षक | स-३०: १४४२००-२१८२०० ग्रेड पे १०००० | १ | १ |
| अधीक्षक अभियंता (निरीक्षण) | एस-२५:७८८००-२०९२०० ग्रेड पे ७६०० | ४ | ४ |
| विद्युत निरीक्षक | एस-२३:६७७००-२०८७०० ग्रेड पे ६६०० | ४० | ४० |
| सचिव, अनुज्ञापक मंडळ | एस-२५:७८८००-२०९२०० ग्रेड पे ६६०० | | |
| सहाय्यक विद्युत निरीक्षक | एस-२०:५६१००-१७७५०० ग्रेड पे ५४०० | ७८ | ७८ |
| | **एकूण** | **१२३** | **१२३** |
| **राजपत्रित, वर्ग दोन-** | | | |
| सहाय्यक अभियंता वर्ग २/ शाखा अभियंता वर्ग २ | एस-१५:४१८००-१३२३०० ग्रेड पे ४४०० | ३५४ | ३५४ |
| **अराजपत्रित, वर्ग तीन** | | | |
| कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता, | एस-१४:३८६००-१२२८०० ग्रेड पे ४३०० | ४३ | ४३ |
| अधीक्षक | एस-१४:३८६००-१२२८०० ग्रेड पे ४३०० | २ | २ |
| प्रमुख लिपिक | एस-१३:३५४००-११२४०० ग्रेड पे ४२०० | १७ | १७ |
| लंघुलेखक | एस-१४:३८६००-१२२८०० ग्रेड पे ४३०० | ४ | ४ |
| आरेखक | एस-१३:३५४००-११२४०० ग्रेड पे ४२०० | १ | १ |
| वरिष्ठ लिपिक | एस-८:२५५००-८११०० ग्रेड पे २४०० | ८९ | ८९ |
| कनिष्ठ लेखा परीक्षक | एस-८:२५५००-८११०० ग्रेड पे २४०० | ० | ० |
| लिपिक-नि-टंकलेखक | एस-६:१९९००-६३२०० ग्रेड पे-१९०० | १८१ | १८१ |
| अनुरेखक लिपिक | एस-६:१९९००-६३२०० ग्रेड पे-१९०० | १ | १ |
| उद्वाहन यांत्रिक | एस-८:२५५००-८११०० ग्रेड पे २४०० | ० | ० |
| जीपचालक | एस-६:१९९००-६३२०० ग्रेड पे-१९०० | १८ | १८ |
| | **एकूण -अराजपत्रित** | **७१०** | **७१०** |
| **वर्ग चार -** | | | |
| दफ्तरी | एस-३:१६६००-५२४०० ग्रेड पे १६०० | १३ | १३ |
| नाईक | एस-३:१६६००-५२४०० ग्रेड पे १६०० | १४ | १४ |
| शिपाई | एस-१:१५०००-४७६०० ग्रेड पे १३०० | ८५ | ८५ |
| मदतनीस | एस-१:१५०००-४७६०० ग्रेड पे १३०० | ५ | ५ |
| चौकीदार | एस-१:१५०००-४७६०० ग्रेड पे १३०० | ७ | ७ |
| | **एकूण - वर्ग चार** | **१२४** | **१२४** |